**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
बृहन्मुंबई "के/पूर्व" प्रभागाच्या सुधारीत मंजूर विकास योजनेतील फेरबदलाबाबत कलम ३७ (१अअे) खालील सूचना.........

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**क्रमांक :- टिपीबी ४३१२ / ९२/(कॅम्प)/प्र.क्र. ३९/ २०१२ /नवि-११**
**मंत्रालय, मुंबई :४०० ०२१,**
**दिनांक –२९ डिसेंबर,२०१६.**

**शासन निर्णय :** सोबतची सूचना शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( श्रीरंग दि. लांडगे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे सचिव.**
**मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे खाजगी सचिव.**

**प्रति,**

(१) **महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे(पूर्व),मुंबई ४०० ०५१.**
(२) महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
(३) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे
(४) सह सचिव, तथा संचालक, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
(५) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई, इन्सा हटमेंट, महापालिका मार्ग, मुंबई- ४०० ००१.

२/- सदर सूचना शासनाच्या दिनांक १३.९.२०१० रोजीच्या परिपत्रकातील निदेशानुसार व खालीलप्रमाणे जाहिरात म्हणून प्रसिध्द करुन घेणेबाबत सत्वर कार्यवाही करावी.

| | | |
|---|---|---|
| १) | जाहिरात देणा-या कार्यालयाचे नांव | नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई-३२. |
| २) | जाहिरात कोणत्या दिनांकास द्यावयाची आहे | तात्काळ |
| ३) | प्रसिध्दीचे स्वरुप | स्थानिक |
| ४) | कोणत्या जिल्हयामध्ये | बृहन्मुंबई महागनरपालिका क्षेत्रामध्ये |
| ५) | किती वृत्तपत्रात | एका मराठी व एका इंग्रजी वृत्तपत्रात |
| ६) | वृत्तपत्राचे नांव | सर्वाधिक खपाच्या वृत्तपत्रात |

| | | |
|---|---|---|
| ७) | किती वेळा | एकदा |
| ८) | जाहिरात खर्चाचे देयक कोणत्या अधिका-याकडे पाठवावयाचे त्या कार्यालयाचे नांव व संपूर्ण पत्ता | मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड, एमएमआरडीए बिल्डींग, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा(पूर्व), मुंबई ४०० ०५१. |

(६) प्रमुख अभियंता (वि.नि.), बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.

(७) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.

( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय सूचना महाराष्ट्र शासनाचे साधारण राजपत्रात भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या १० प्रती प्रत्येकी नगर विकास विभाग (नवि-११), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना पाठविण्यात याव्यात.)

(८) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९,( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची सूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.)

(९) व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड

(१०) निवड नस्ती (नवि-११)

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
बृहन्मुंबई "के/पूर्व" प्रभागाच्या सुधारीत मंजूर विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदलाबाबत कलम ३७ (१अअ) खालील सूचना.........

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई** :४०० ०३२,
**दिनांक** – २९ **डिसेंबर**,२०१६.

**क्रमांक :- टिपीबी** ४३१२ / ९२/(**कॅम्प**)/**प्र.क्र.** ३९/ २०१२ /**नवि-११**

**सूचना**

ज्याअर्थी, बृहन्मुंबई क्षेत्राच्या " **के/पूर्व** " प्रभागाची विकास योजना (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त विकास योजना " असा करण्यात आला आहे.), शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीबी ४३९२/ ४७१६/प्र.क्र.१८१/९२/नवि-११ दि. १२.११.१९९२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) च्या कलम ३१(१) खालील तरतूदीनुसार मंजूर झाली असून, ती दि. २९.१२.१९९२ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे मुंबई मेट्रो रेल्वेची योजना विशेष हेतू वाहन कंपनी मुंबई मेट्रो कार्पोरेशन लिमिटेड (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त प्राधिकरण" असा केलेला आहे) यांचे माध्यमातून राबवित आहे;

आणि ज्याअर्थी. उक्त प्राधिकरणाने मेट्रो लाईन-III, कुलाबा बांद्रा-कॉरिडॉर च्या आरे कार डेपोसाठी मौजे प्रजापूर येथील न.भू.क्र. ९ (भाग), १0(भाग), ११(भाग), १२(भाग), १३ (भाग) आणि मौजे व्यारवली न.भू.क्र. २(भाग) मिळून एकंदर ३३ हेक्टर जागा आवश्यक असल्याचे कळवून सदर जागा उक्त विकास योजनेमधील ना विकास वापर विभागातून वगळून **मेट्रो कार डेपो/वर्कशॉप अनुषंगिक सुविधा आणि वाणिज्य (C१) वापरासाठी** आरक्षित करावी अशी विनंती केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, कृषि पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास आणि मत्स्यविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील दिनांक ५ मार्च २०१४ रोजीच्या ज्ञापनान्वये त्यांचे ताब्यातील मौजे प्रजापूर येथील न.भू.क्र. ९ (भाग), १0(भाग), ११(भाग), १२(भाग), १३ (भाग) मधील २९.७९ हेक्टर आणि दिनांक १६ मार्च २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये अतिरिक्त ३.०० हेक्टर जमीन आरे कार डेपोसाठी हस्तांतरीत करणेस मान्यता दिलेली आहे;

आणि ज्याअर्थी, मध्यतंरीचे कालावधीत शासन निर्णय क्रमांक एमआरडी-३३१५/प्र.क्र.२३/नवि-७ दिनांक ११ मार्च २०१५ अन्वये सदर प्रस्तावित कार डेपोसाठी इतरत्र जागा उपलब्ध होणेची शक्यता पडताळणेसाठी तसेच इतरत्र जागा उपलब्ध न झालेस वृक्ष तोड कमी होणेसाठी त्याचप्रमाणे पर्यावरणावरील आघात कमी करणेसाठी अभ्यास करुन शासनास उपाययोजना सुचविणेसाठी महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली होती;

आणि ज्याअर्थी, सदर समितीने शासनास त्यांचा शिफारशीवजा अहवाल सादर केलेला आहे आणि उक्त प्राधिकरणाने दिनांक १.४.२०१६ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनास अशी विनंती केलेली आहे की कार डेपोसाठी पर्यायी जागा उपलब्ध होत नसून उक्त जागेचा वापर कार डेपोसाठी जवळपास ५० टक्केपेक्षा जास्त वृक्ष वाचवून तसेच समितीच्या अहवालामध्ये सुचविलेप्रमाणे तोड होणा-या वृक्षांसाठी १:३ प्रमाणात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेवून करता येणे शक्य असल्याने त्याच ठिकाणी कार डेपोचा प्रस्ताव मंजूर करावा;

आणि ज्याअर्थी, शासनाचे असे मत झालेले आहे की उक्त जागा, उकत विकास योजनेमधील ना विकास वापर विभागातून वगळून **मेट्रो कार डेपो/वर्कशॉप अनुषंगिक सुविधा आणि वाणिज्य (C१) वापरासाठी** आरक्षित करणे सार्वजनिक हितास्तव आवश्यक आहे (यापुढे याचा उल्लेख" प्रस्तावित फेरबदल" असा केलेला असून योसाबतच्या परिशिष्टामध्ये विशेषत्वाने त्याबाबत नमूद केलेले आहे);

आणि त्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती आणि वस्तुस्थिती विचारात घेता आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट कलम (१कक) अन्वये प्राप्त अधिकार आणि त्या संदर्भातील सर्व शक्तींचा वापर करुन, शासन याद्वारे प्रस्तावित फेरबदलाविषयी उक्त अधिनियमाच्या कलम ३७, पोट कलम (१कक) चे खंड(क) नुसार कोणत्याही व्यक्तीकडून सदरची सूचना शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून एक महिन्याचे मुदतीमध्ये सूचना/हरकती मागविण्यासाठी, सूचना प्रसिध्द करीत आहे;

शासनाकडून असेही कळविणेत येत आहे की, प्रस्तावित फेरबदलाविषयी कोणत्याही हरकत/सूचना शासन राजपत्रात सदर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांचेकडे इन्सा हटमेंटस, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४००००१ या कार्यालयाचे पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांच्याकडे सदरच्या कालावधीत प्राप्त होणा-या हरकती/सूचना यावर उक्त अधिनियमाच्या कलम ३७च्या पोट कलम (१कक) अन्वये कार्यवाही करण्यात येईल;

**प्रस्तावित फेरबदल**

" मौजे प्रजापूर येथील न.भू.क्र. ९ (भाग), १0(भाग), ११(भाग), १२(भाग), १३ (भाग) आणि मौजे व्यारवली न.भू.क्र. २(भाग) मिळून एकंदर ३३ हेक्टर जागा मंजूर विकास योजनेमधील ना विकास वापर विभागातून वगळून **मेट्रो कार डेपो/वर्कशॉप अनुषंगिक सुविधा आणि वाणिज्य (C१) वापरासाठी** ( यासोबतच्या

भाग नकाशावर विशेषत्त्वाने दर्शविलेप्रमाणे) आरक्षित करणेचे प्रस्तावित करणेत येत आहे. सदर आरक्षणासाठी " **मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड**" हे समुचित प्राधिकरण रहाणार आहे."

प्रस्तावित फेरबदलाचा नकाशा नागरिकांचे अवलोकनार्थ खालील ठिकाणी कार्यालयीन वेळेमध्ये उपलब्ध राहिल.

1) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे(पूर्व), मुंबई ४०० ०५१.
2) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांचेकडे इन्सा हटमेंटस, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१
3) प्रमुख अभियंता(विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

सदर फेरबदलाची सूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(श्रीरंग दि. लांडगे)
**शासनाचे सह सचिव.**

**Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.**
**Modification to the Sanctioned Revised Development Plan of Greater Mumbai, 1991, K (East) ward under Section 37 (1AA) of the Act...**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department,**
**Mantralaya, Mumabi 400 032.**
**Dated : 29th December,2016.**

**NOTICE**

**No.TPB 4312/92/(Camp)/CR-39/2012/UD-11:**

Whereas the Revised Development Plan of "**K/E**" ward of Greater Mumbai (hereinafter referred to as "the said Development Plan") has been sanctioned by the Government in the Urban Development Department, under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") vide Notification No.TPB 4392/4716/CR-181/92/ UD-11, dated 12th November 1992, so as to come into force with effect from the 29th December,1992;

And whereas, the Mumbai Metropolitan Region Development Authority is implementing Mumbai Metro Master plan through Special purpose Vehicle Company "Mumbai Metro Corporation Limited( hereinafter referred to as "the said Authority" );

And whereas, the said Authority has requested that the land admeasuring about 33 Hectare., bearing CTS No. 9(pt.), 10(pt.), 11(pt.), 12(pt.), 13(pt.) of village Prajapur and CTS No.2 (Pt.) of Village Vyravali (hereinafter referred to as "the said land) is required for Arey Car Depot for Metro line-III, Colaba-Bandra Corridor and also requested to change the use of the said land in the said Development plan from **No Development Zone** to **Metro Car Depot/Workshop, allied facilities and Commercial (C-1) Zone;**

And whereas, the Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department, Government of Maharashtra, vide memorandum dated 5th March 2014, has accorded sanction to transfer the land in their possession bearing CTS No. 9(pt.), 10(pt.) 11(pt.)12(pt.) 13(pt.) of village Prajapur admeasuring about 29.79 Hectare for Arey Car Depot and also accorded sanction to transfer additional 3.00 Hectare land from CTS NO. 12(pt.) and 13 (pt)vide Government Resolution dated 16th March 2016 for the same purpose.

And whereas, in the meantime the State Government has constituted Committee vide Government Resolution No. MRD-3315/CR 23/UD-7 dated 11th March 2015 under the Chairmanship of the Metropolitan Commissioner, Mumbai Metropolitan Region Development Authority regarding the proposed Car Depot on the said land to study the alternatives for locating Car Depot, if possible and to minimize damage to the trees on the site if suitable alternative is not found and also to suggest mitigation measures to minimize environmental damages;

And whereas, the Committee has submitted report with their recommendations to the State Government and the said Authority vide letter dated 1st April 2016 has intimated to the State Government that the alternative site is not available and the said land can be utilized for Car Depot by saving more than 50% of trees and plantation will be undertaken as per statutory requirements of 1:3 trees for every tree cut as per Committee's recommendations and requested to sanction Car Deport on the said land.

And whereas, the State Government is opinion that in the public interest it is necessary to delete the said land from the No Development Zone in the said Plan and to reserve it for **Metro Car Depot/Work shop, allied facilities and Commercial(C-1)Zone**. (hereinafter referred to as "the proposed modification" and more specifically described in the Schedule appended hereto ")

Now, therefore, after considering the above facts and circumstances and in exercise of powers vested in it under sub-section (1AA) of Section 37 of the said Act, and all other powers enabling it in this behalf, the Government hereby publishes a Notice for inviting suggestions and objections from any person with respect to proposed modification, as required by clause (a) of sub-section (1AA) of Section 37 of the said Act, within period of one month from the date of publication of this Notice in the Maharashtra Government Gazette.

Any objections/ suggestions in respect of the proposed modification may be forwarded before the expiry of one month from the date of publication of this Notice in the Maharashtra Government Gazette, to the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, having his office at ENSA Hutments, E-Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400 001. Any objection or suggestion, which may be received by the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai within the said period shall be dealt with in accordance with the provisions of the said sub-section (1AA) of Section 37 of the said Act.

## SCHEDULE

" The land admeasuring about 33 Hectare bearing CTS No. 9(pt.), 10(pt.), 11(pt.), 12(pt.), 13(pt.) of village Prajapur and CTS No.2 (pt.) of Village Vyravali (as more particularly shown on the part plan attached herewith ) is proposed to be deleted from **"No Development Zone"** and to be reserved for reservation of **"Metro Car Depot/Workshop, allied users and Commercial (C-1)Zone."** The Appropriate Authority for development of the said reservation shall be " **Mumbai Metro Rail Corporation limited**."

A plan showing the proposed modification shall be kept open for the inspection of the general public at the following places:-

(1) Office of the Metropolitan Commissioner, Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra Kurla Complex, Bandra(East), Mumbai 400 051.

(2) Office of the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, having his office at ENSA Hutments, E-Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400001.

(3) Office of the Chief Engineer (Development Plan) Municipal Corporation of Greater Mumbai, Mahapalika Marg, Mumbai 400001.

This Notice shall also be available on the Govt. of Maharashtra website : www.maharashtra.gov.in

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**( S. D. Landge )**

**Joint Secretary to Government.**